# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** कराड शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0124 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**03/02/2026 23:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिंनाक पासून):** 03/02/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 03/02/2026
**Time From (वेळेपासून):** 14:04 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:14 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 03/02/2026 **Time (वेळ):** 23:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 072
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 03/02/2026 23:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय,कराड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेंद्र अशोक सानप

(b) **Father's Name (वडील चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोल्हापूर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोल्हापूर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8208971207

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कुंडलिक खंडू मोडक | | | 1. होले फमिली स्कुल मागे,, राजनंदिनी रेसिडेन्सी,सैदापुर कराड ,कराड शहर,सातारा, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनी नोटा 500 X | 7,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | 14 | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

7,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दिंनाक - 03/02/2026

मी राजेंद्र अशोक सानप वय 40 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8208971207 समक्ष कराड शहर पोलीस ठाणेस हजर राहुन फिंयाद देतो की,

आज दिंनाक 03/02/2026 रोजी अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना मा.पोलीस अधीक्षक श्री शिरीष सरदेशपांडे, लाप्रवि पुणे यांनी आमचे मोबाईलवर फोनकरून तक्रारदार नामे वैभव विलास थोरात रा.ओंड ता.कराड जि.सातारा मो नं. 9423357348 यांची उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय कराड येथील परिरक्षण भुमापक मोडक यांचे विरूध्द लाचे संबधी तक्रार आहे तरी आपण सदर गोपनिय तक्रारी नुसार कारवाई करून केले कारवाईचा अहवाल सादर करावा असे कळवून तसा लेखी आदेशही पाठविला.त्यावेळी आम्ही लागलीच तक्रारीवर कारवाई करणेसाठी आयुक्त,कोल्हापूर महानगरपालीका, कोल्हापूर यांना पत्र देवून दोन पंच उपलब्ध करून घेतले. मी व तक्रारदार फोनवरून एकमेकांचे संपर्कात होतो. त्यानंतर आम्ही, दोन शासकीय पंच व स्टाफ असे शासकीय न्यु बोलेरो गाडी नं.एमएच 09 जीयु 7591 या वाहनातून लाप्रवि कार्यालयातून रवाना झालो.प्रवासा दरम्यान आम्ही तक्रारदार यांचे संपर्कात राहून त्यांना कराडचे अलीकडे असले कोयना शासकीय औद्योगिक वसाहत मलकापूर येथे येण्याबाबत कळवून आंम्ही त्याठिकाणी तक्रारदार यांना 13.25 वा. भेटलो. त्यावेळी मी तक्रारदार थोरात यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करून दिली. त्यावेळी आम्ही तक्रारदार थोरात यांना त्यांची तक्रार विचारली असता त्यांनी त्यांची थोडक्यात हकिकत सांगितली की, ओंड गावचा रहिवासी असून मी सध्या आयटीबीपीएफ मध्ये का◌ॅन्स्टेबल जी.डी.पदावर अरूणाचल प्रदेश येथे नोकरीस आहे. ओंड गांवी माझे व भाउ संदीप थोरात असे आमचे नांवे सिंसन 583 याठिकाणी 42.50 चै.मि.इतकी जागा आहे.सदर जागेवर मी व भाउ संदीप असे आंम्ही एकत्रीत घर बांधकाम सुरू केलेले आहे.घराचे बांधकामाकरीता आंम्ही दोघांचे नांवे बँक आ◌ॅफ महाराष्ट्र शाखा मलकापूर येथून 22,12,000 रूपये इतके कर्ज मंजूर झाले आहे.सदर कर्जाकरीता आंम्ही वरील मिळकत ही बँकेस तारण दिली असून तसा बँकेमध्ये व आमचेमध्ये मा◌ॅरगेजचा रजिस्टर दस्त दि.05.01.2026 रोजी करण्यात आलेला आहे.परंतु सदर कर्जाची रक्कम ही आमचे खात्यावर वर्ग होणेकरीता आमचे मालमत्ता पत्रकावर बँकेचा बोजा नोंद होणे आवश्यक असल्याने मी दि.29.01.2026 रोजी मा◌ॅरगेज दस्ताची छायाकिंत प्रत,इंडेक्स सुची व मालमत्ता पत्रक असे जोडून आमचे मिळकतीवर बोजा नोंद करून मिळणेकरीता उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय,कराड येथील परिरक्षण भुमापक मोडक यांना समक्ष भेटून त्यांचेकडे रितसर अर्ज देवून त्याची पोहच घेतली होती.त्यावेळी मोडक यांनी आमचे मालमत्ता पत्रकावर बोजा नोंद करून देण्यासाठी 10,000 द्यावे लागतील असे म्हणाले.त्यावेळी मी त्यांना त्याची पावती मिळणार काय असे विचारले असता त्यांनी नाही म्हणून सांगितले.त्यावेळी मी ठिक आहे असे म्हणून निघून आलो. परिरक्षण भुमापक मोडक हे माझेकडे मागत असलेले 10,000/- रूपये हे लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे.मी परिरक्षण भुमापक मोडक यांना आज दि.03/02/2026 रोजी भेटण्यास जाणार आहे. तरी त्यांचेवर कायदेशीर कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन तक्रारी अर्ज दिला. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार थोरात यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. तक्रारदार थोरात यांनी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व दोन्ही पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार थोरात व पंच नं.01 गोदमले यांचेसह परिरक्षण भुमापक मोडक यांना भेटणेसाठी उपअधीक्षक भुमी अभिलेख कराड येथील कार्यालयात पाठवुन थोरात यांचे तक्रारीप्रमाणे त्यांचेकडे मोडक

हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हाॅईस रेकाॅ
ड
र काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे नविन मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकाॅर्डरचे त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 गोदमले यांना परिरक्षण भुमापक मोडक यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी तक्रारदार यांचे सोबत उपअधीक्षक भुमी अभिलेख कराड कार्यालयात गेलो त्यावेळी मोडक हे त्यांचे कार्यालयात हजर नसल्याने तक्रारदार यांनी मोडक यांचे मोबाईलवर फोन केला त्यावेळी मोडक यांनी टकले हाॅस्पीटल येथे येण्यास सांगितले.त्याप्रमाणे तक्रारदार यांचे सोबत मी टकले हाॅस्पीटल येथे गेलो त्यावेळी मोडक यांची भेट झाली.त्यावेळी मोडक यांनी त्यांची तब्बेत बरी नसल्याने दवाखान्यात आलो असल्याचे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी कसे आला आहे असे विचारले त्यावेळी मोडक यांनी एकजण सोडायला आला होता असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी गाडीवरण आला काय असे विचारले त्यावेळी मोडक यांनी हो गाडीवरून आलो तुम्ही दोघं हाय काय असे विचारले त्यावेळी तक्रारदार यांनी हो दोघं हाय जावूया ट्रिबल असे म्हणाले त्यावेळी मोडक यांनी नको असे म्हणालेवर तक्रारदार यांनी मग काय सोडू का असे विचारलेवर मोडक यांनी हा असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी तुम्हाला सोडतो आणि याला न्यायला येतो असे म्हणालेवर मोडक यांनी हा हा .... आपल्याला बोलायला येईल असे म्हणालेने मला तेथेच थांबायला सांगून मोडक यांना घेवून तक्रारदार त्यांचे आॅफिसला सोडण्यास गेले.त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार हे परत टकले हाॅस्पीटल जवळ आले त्यानंतर मी त्यांचे सोबत आपण थांबलेल्या ठिकाणी आलो असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार थोरात यांना परिरक्षण भुमापक मोडक यांना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी मोडक हे त्यंाचे कार्यालयात नसल्याने त्यांना फोन केला त्यावेळी त्यांनी टकले हाॅस्पीटल येथे बोलविलेने आम्ही तेथे गेलो. त्यावेळी मोडक यांनी त्यांना त्यांचे कार्यालयास सोडण्यास सांगितलेने मी त्यांना घेवून उपअधीक्षक भुमी अभिलेख कराड कार्यालयाकडे आलो.आंम्ही मोटरसायकलवरून येत असताना मोडक यांचेशी माझे कामाचे अनुषंगाने चर्चा झाली.आंम्ही मोडक यांचे आॅफिस जवळ आलो त्यावेळी मी, किती दिवसात होईल काय ? असे विचारले त्यावेळी मोडक यांनी या दोन तीन दिवसात करतो म्हटलो ना तुम्हाला असे म्हणाले त्यावर मी त्यांना चालतयं असे म्हणालो त्यावेळी मोडक यांनी, तुम्हाला म्हटलं तेवढं पेमेंट करून टाका असे म्हणाल,े त्यावर मी त्यांना आ असे विचारलेवर मोडक यांनी पेमेंट करून टाका म्हणजे लवकर करून असे म्हणाले त्यावर मी त्यांना हा किती पेमेंट.... किती पेमेंट लागेल असे विचारले त्यावेळी मोडक यांनी दहा करून टाका म्हटलं दहा ,असे म्हणाले त्यावर मी ,त्यांना दहा काय कमी नाय असे विचारले त्यावर मोडक यांनी बोललो होतो तस म्हटलं होत ना त्यावेळेला, म्हणून मी तर तुम्हाला लवकर म्हणालोय नोटीस पण काढणार नाही, तुम्हाला एक मिनीटामध्ये असे म्हणाले त्यावर मी , सात हजार होणार नाही का असे विचारले त्यावर मोडक यांनी बर सात दया राहिलेलं तीन नंतर काम झाल्यावर दया बस आता काय सांगू नका असे म्हणाले त्यावर मी , सात हजार देवू असे विचारले त्यावर मोडक यांनी हं.....काय होतयं असे म्हणाले त्यावर मी त्यांना दहा हजार लागणारचं असे विचारले त्यावर मोडक यांनी लागणारचं बोललेलं असतं पुढं ऐवढं काय नाही. आपण बोलून.... माझं पण काय सगळंच पायाला दयायचं म्हटलं म्हणजे मला पण भेटलं पाहिजे काय ? म्हणून त्याचा काय उपयोग नाय असे म्हणाले त्यावर मी , कुणाला साहेबाला दयायला साहेबाला असे विचारले त्यावर मोडक यांनी असतयं ते त्याचे लेव्हला तयार करणारे, मंजूर करणारे मंडळी असतात त्यांना म्हणायचं हाय का कुणाला दयायचं किती दयायचं तुम्हाला काम झालेशी मतलब असे म्हणाले त्यावर आमचेमध्ये पुन्हा चर्चा झाली त्यावेळी मोडक यांनी आता सात हजार आणि नंतर तीन हजार देवू का ? असे विचारले त्यावर मोडक यांनी हा झाल्यावर दया नंतर काय ..... तुम्ही नाय आला तर दुस-या कोणाकडून दिंल तरी चालेलं तुम्हीच यायला पाहिजे अस नाही. ते तेवढं काढून बघा त्याचेवर नोंद लागली का? सांगतो फोन करून तस झाले असेल तर असे म्हणाले त्यानंतर आमचेमध्ये कामा संदर्भात चर्चा झाली व त्यानतंर पैसे घेवून साडेतीन पर्यंत या असे म्हणाले नंतर मी मोटरसायकलने तेथून निघून टकले हाॅस्पीटल पासून पंच गोदमले यांना घेवून आपण थांबलेल्या ठिकाणी आलो अशी हकीकत सांगितली.

पडताळणी कारवाईमध्ये परिरक्षण भुमापक मोडक यांनी तक्रारदार यांचे मालमत्ता पत्रकी कर्जाचा बोजा नांेद करण्यासाठी 10,000 रूपये लाचेची मागणी करून 7000 रू.लगेच देण्यास सांगून उर्वरीत 3000 रूपये काम झालेनंतर देण्यास सांगून लाच मागणी केलेचे निष्पन्न झालेने आम्ही परिरक्षण भुमापक मोडक यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

त्यानंतर मी तक्रारदार थोरात यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/-

दराच्या 14 चलनी नोटा अशी 7,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार थोरात व पंचाना अ◌ॅथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही, केलेनंतर अं◌ॅथ्रासिन लावलेले 7,000/- रूपये तक्रारदार यांचे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार थोरात, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या तसेच तक्रारदार थोरात यांना मोडक याने लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांचे पॅन्टच्या डावे बाजूच्या खिशातील हातरुमाल काढून चेह-यावरून फिरवुन पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार थोरात व दोन्ही पंचाचे निवेदन व्हाईस
रेका◌ॅ
ड
र मध्ये रेका◌ॅर्ड केले. त्यावेळी तक्रारदार यांनी मोडक हे त्यांचे मध्यवर्ती प्रशासकीय इमारत कराड येथे असलेल्या कार्यालया

तरी यातील मुळ तक्रारदार थोरात यांचे व त्यांचे भाउ यांचे नांवे असलेल्या ओंड ता.कराड जि.सातारा येथील सिंसन 583 या मिळकतीमध्ये सुरू असलेल्या बांधकामाकरीता बँक आ◌ॅफ महाराष्ट्र शाखा मलकापूर या बँकेकडून घेतलेल्या 22,12,000 रू.कर्जाचा मालमत्ता पत्रकावर बोजा नोंद करणेसाठी उपअधीक्षक भुमी अभिलेख कराड कार्यालयातील परिरक्षण भुमापक कुंडलिक मोडक यांनी पहिला हप्ता 7000 रूपये व काम झालेनंतर 3000 रूपये अशी 10,000 रूपये लाचेची मागणी करून त्यापैकी पहिला हप्ता लाच रक्कम 7000 रूपये तक्रारदार थोरात यांचेकडुन बेकायदेशिरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना त्यांना आम्ही तसेच सापळा पथकाने पकडले आहे म्हणुन माझी कुंडलिक खंडू मोडक वय 38 वर्षे पद परिरक्षण भुमापक, उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय,कराड जि. सातारा रा.क्षीरसागर यांचे घरी भाडयाने ,होले फॅमिली स्कुल मागे,राजनंदिनी रेसिडेन्सी, सैदापुर कराड मुळगांव जिल्हा परिषद शाळेजवळ,खटकाळे ता.जुन्नर जि.पुणे यांचेविरूध्द माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे *कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे.*

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
कराड शहर
**District (जिल्हा):** सातारा
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** DATTATRAY MAHAD
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PSMH27149

पोलीस स्टेशन ऑफिसर
कराड शहर पोलीस ठाणे, जि. सातारा
दि. 03/02/2026.

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**

फिर्याद दिनांक — ०३/०२/२०२६

मी राजेंद्र अशोक सानप वय ४० वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. ८२०८९७१२०७ समक्ष कराड शहर पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना मा.पोलीस अधीक्षक श्री शिरीष सरदेशपांडे, लाप्रवि पुणे यांनी आमचे मोबाईलवर फोनकरून तक्रारदार नामे वैभव विलास थोरात रा.ओंड ता.कराड जि.सातारा मो नं. ९४२३३५७३४८ यांची उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय कराड येथील परिरक्षण भुमापक मोडक यांचे विरूध्द लाचे संबधी तक्रार आहे तरी आपण सदर गोपनिय तक्रारी नुसार कारवाई करून केले कारवाईचा अहवाल सादर करावा असे कळवून तसा लेखी आदेशही पाठविला.त्यावेळी आम्ही लागलीच तक्रारीवर कारवाई करणेसाठी आयुक्त,कोल्हापूर महानगरपालीका, कोल्हापूर यांना पत्र देवून दोन पंच उपलब्ध करून घेतले. मी व तक्रारदार फोनवरून एकमेकांचे संपर्कात होतो. त्यानंतर आम्ही, दोन शासकीय पंच व स्टाफ असे शासकीय न्यु बोलेरो गाडी नं.एमएच ०९ जीयु ७५९१ या वाहनातून लाप्रवि कार्यालयातून रवाना झालो.प्रवासा दरम्यान आंम्ही तक्रारदार यांचे संपर्कात राहून त्यांना कराडचे अलीकडे असले कोयना शासकीय औद्योगिक वसाहत मलकापूर येथे येण्याबाबत कळवून आंम्ही त्याठिकाणी तक्रारदार यांना १३.२५ वा. भेटलो. त्यावेळी मी तक्रारदार थोरात यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करून दिली. त्यावेळी आम्ही तक्रारदार थोरात यांना त्यांची तक्रार विचारली असता त्यांनी त्यांची थोडक्यात हकिकत सांगितली की, ओंड गावचा रहिवासी असून मी सध्या आयटीबीपीएफ मध्ये कॉन्स्टेबल जी.डी.पदावर अरूणाचल प्रदेश येथे नोकरीस आहे. ओंड गांवी माझे व भाउ संदीप थोरात असे आमचे नांवे सिसनं ५८३ याठिकाणी ४२.५० चौ.मि.इतकी जागा आहे.सदर जागेवर मी व भाउ संदीप असे आंम्ही एकत्रीत घर बांधकाम सुरू केलेले आहे.घराचे बांधकामाकरीता आंम्ही दोघांचे नांवे बॅक ऑफ महाराष्ट्र शाखा मलकापूर येथून २२,१२,००० रूपये इतके कर्ज मंजूर झाले आहे.सदर कर्जाकरीता आंम्ही वरील मिळकत ही बॅकेस तारण दिली असून तसा बॅकेमध्ये व आमचेमध्ये मॉरगेजचा रजिस्टर दस्त दि.०५.०१.२०२६ रोजी करण्यात आलेला आहे.परंतु सदर कर्जाची रक्कम ही आमचे खात्यावर वर्ग होणेकरीता आमचे मालमत्ता पत्रकावर बॅकेचा बोजा नोंद होणे आवश्यक असल्याने मी दि. २९.०१.२०२६ रोजी मॉरगेज़ दस्ताची छायांकिंत प्रत,इंडेक्स सुची व मालमत्ता पत्रक असे जोडून आमचे मिळकतीवर बोजा नोंद करून मिळणेकरीता उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय,कराड येथील परिरक्षण भुमापक मोडक यांना समक्ष भेटून त्यांचेकडे रितसर अर्ज देवून त्याची पोहच घेतली होती.त्यावेळी मोडक यांनी आमचे मालमत्ता पत्रकावर बोजा नोंद करून देण्यासाठी १०,००० द्यावे लागतील असे म्हणाले.त्यावेळी मी त्यांना त्याची पावती मिळणार काय असे विचारले असता त्यांनी नाही म्हणून सांगितले.त्यावेळी मी ठिक आहे असे म्हणून निघून आलो. परिरक्षण भुमापक मोडक हे माझेकडे मागत असलेले १०,०००/— रूपये हे लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे.मी परिरक्षण भुमापक मोडक यांना आज दि.०३/०२/२०२६ रोजी भेटण्यास जाणार आहे. तरी त्यांचेवर कायदेशीर कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन तक्रारी अर्ज दिला. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार थोरात यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. तक्रारदार थोरात यांनी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व दोन्ही पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार थोरात व पंच नं.०१ गोदमले यांचेसह परिरक्षण भुमापक मोडक यांना भेटणेसाठी उपअधीक्षक भुमी अभिलेख कराड येथील कार्यालयात पाठवुन थोरात यांचे तक्रारीप्रमाणे त्यांचेकडे मोडक हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये KDM कंपनीचे ८ जीबीचे नविन मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार थोरात व पंचाची खात्री करून दिली. तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर तक्रारदार थोरात व दोन्ही पंचाचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर १४.०४ वाजता चालु करून, तो तक्रारदार थोरात यांचे गळयात काळया दो—याच्या साहयाने अडकवुन तक्रारदार थोरात व पंच नं.१ गोदमले यांना परिरक्षण भुमापक मोडक यांची भेट घेण्याकरीता, त्यांचे मोटर सायकल क्रमांक एमएच ५० एक्स ३९९७ वरून उपअधीक्षक भुमी अभिलेख कराड कार्यालयात पाठविले. त्यांनतर काहीवेळाने तक्रारदार थोरात व पंच नं.१ गोदमले असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर १४.५६ वाजता बंद केला.

कराडशहर पो.ठाणे गु.र.नं. 12[redacted]/26 भ्रष्टाचार प्रति. अधि 1988 चे कलम 7 ... 72/23:51 03/02/26 HC 1388 पो[redacted] कराडशहर पो.ठाणे

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.०१ गोदमले यांना परिरक्षण भुमापक मोडक यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी तक्रारदार यांचे सोबत उपअधीक्षक भुमी अभिलेख कराड कार्यालयात गेलो त्यावेळी मोडक हे त्यांचे कार्यालयात हजर नसल्याने तक्रारदार यांनी मोडक यांचे मोबाईलवर फोन केला त्यावेळी मोडक यांनी टकले हॉस्पीटल येथे येण्यास सांगितले.त्याप्रमाणे तक्रारदार यांचे सोबत मी टकले हॉस्पीटल येथे गेलो त्यावेळी मोडक यांची भेट झाली.त्यावेळी मोडक यांनी त्यांची तब्बेत बरी नसल्याने दवाखान्यात आलो असल्याचे सांगितले.त्यावर तक्रारदार यांनी कसे आला आहे असे विचारले त्यावेळी मोडक यांनी एकजण सोडायला आला होता असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी गाडीवरण आला काय असे विचारले त्यावेळी मोडक यांनी हो गाडीवरून आलो तुम्ही दोघं हाय काय असे विचारले त्यावेळी तक्रारदार यांनी हो दोघं हाय जावूया ट्रिबल असे म्हणाले त्यावेळी मोडक यांनी नको असे म्हणालेवर तक्रारदार यांनी मग काय सोडू का असे विचारलेवर मोडक यांनी हा असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी तुम्हाला सोडतो आणि याला न्यायला येतो असे म्हणालेवर मोडक यांनी हा हा .... आपल्याला बोलायला येईल असे म्हणालेने मला तेथेच थांबायला सांगून मोडक यांना घेवून तक्रारदार त्यांचे ऑफिसला सोडण्यास गेले.त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार हे परत टकले हॉस्पीटल जवळ आले त्यानंतर मी त्यांचे सोबत आपण थांबलेल्या ठिकाणी आलो असल्याचे

सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार थोरात यांना परिरक्षण भुमापक मोडक यांना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी मोडक हे त्यांचे कार्यालयात नसल्याने त्यांना फोन केला त्यावेळी त्यांनी टकले हॉस्पीटल येथे बोलविलेने आम्ही तेथे गेलो.त्यावेळी मोडक यांनी त्यांना त्यांचे कार्यालयास सोडण्यास सांगितलेने मी त्यांना घेवून उपअधीक्षक भुमी अभिलेख कराड कार्यालयाकडे आलो.आंम्ही मोटरसायकलवरून येत असताना मोडक यांचेशी माझे कामाचे अनुषंगाने चर्चा झाली.आंम्ही मोडक यांचे ऑफिस जवळ आलो त्यावेळी मी, किती दिवसात होईल काय ? असे विचारले त्यावेळी मोडक यांनी या दोन तीन दिवसात करतो म्हटलो ना तुम्हाला असे म्हणाले त्यावर मी त्यांना चालतयं असे म्हणालो त्यावेळी मोडक यांनी, **तुम्हाला म्हटलं तेवढं पेमेंट करून टाका** असे म्हणाले, त्यावर मी त्यांना आ असे विचारलेवर **मोडक यांनी पेमेंट करून टाका म्हणजे लवकर करून असे म्हणाले त्यावर मी त्यांना हा किती पेमेंट.... किती पेमेंट लागेल असे विचारले त्यावेळी मोडक यांनी दहा करून टाका म्हटलं दहा ,असे म्हणाले त्यावर मी ,त्यांना दहा काय कमी नाय** असे विचारले त्यावर मोडक यांनी बोललो होतो तस म्हटलं होत ना त्यावेळेला, म्हणून मी तर तुम्हाला लवकर म्हणालोय नोटीस पण काढणार नाही, तुम्हाला एक मिनीटामध्ये असे म्हणाले त्यावर मी , **सात हजार होणार नाही का** असे विचारले त्यावर मोडक यांनी **बर सात दया राहिलेलं तीन नंतर काम झाल्यावर दया बस आता काय सांगू नका असे म्हणाले** त्यावर मी , **सात हजार देवू असे विचारले त्यावर मोडक यांनी हं.....काय होतयं असे म्हणाले त्यावर मी त्यांना दहा हजार लागणारचं असे विचारले त्यावर मोडक यांनी लागणारचं बोललेलं असतं पुढं ऐवढं काय नाही. आपण बोलून.... माझं पण काय सगळंच पायाला दयायचं म्हटलं म्हणजे मला पण भेटलं पाहिजे काय ? म्हणून त्याचा काय उपयोग नाय असे म्हणाले त्यावर मी** , कुणाला साहेबाला दयायला साहेबाला असे विचारले त्यावर मोडक यांनी असतयं ते त्याचे लेव्हला तयार करणारे, मंजूर करणारे मंडळी असतात त्यांना म्हणायचं हाय का कुणाला दयायचं किती दयायचं तुम्हाला काम झालेशी मतलब असे म्हणाले त्यावर आमचेमध्ये पुन्हा चर्चा झाली त्यावेळी मोडक यांनी **आता सात हजार आणि नंतर तीन हजार देवू का ? असे विचारले त्यावर मोडक यांनी हा झाल्यावर दया नंतर काय .....** तुम्ही नाय आला तर दुस—या कोणाकडून दिलं तरी चालेलं तुम्हीच यायला पाहिजे अस नाही. ते तेवढं काढून बघा त्याचेवर नोंद लागली का? सांगतो फोन करून तस झाले असेल तर असे म्हणाले त्यानंतर आमचेमध्ये कामा संदर्भात चर्चा झाली व त्यानतंर पैसे घेवून साडेतीन पर्यंत या असे म्हणाले नंतर मी मोटरसायकलने तेथून निघून टकले हॉस्पीटल पासून पंच गोदमले यांना घेवून आपण थांबलेल्या ठिकाणी आलो अशी हकीकत सांगितली.

पडताळणी कारवाईमध्ये परिरक्षण भुमापक मोडक यांनी तक्रारदार यांचे मालमत्ता पत्रकी कर्जाचा बोजा नोंद करण्यासाठी १०,००० रूपये लाचेची मागणी करून ७००० रू.लगेच देण्यास सांगून उर्वरीत ३००० रूपये काम झालेनंतर देण्यास सांगून लाच मागणी केलेचे निष्पन्न झालेने आम्ही परिरक्षण भुमापक मोडक यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

त्यानंतर मी तक्रारदार थोरात यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील ५००/— दराच्या १४ चलनी नोटा अशी ७,०००/— रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार थोरात व पंचाना ॲथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्द्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही, केलेनंतर ॲथ्रासिन लावलेले ७,०००/— रूपये तक्रारदार यांचे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार थोरात, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या तसेच तक्रारदार थोरात यांना मोडक याने लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांचे पॅन्टच्या डावे बाजूच्या खिशातील हातरूमाल काढून चेह—यावरून फिरवुन पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार थोरात व दोन्ही पंचाचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले. त्यावेळी तक्रारदार यांनी मोडक हे त्यांचे मध्यवर्ती प्रशासकीय इमारत कराड येथे असलेल्या कार्यालयामध्ये असण्याची शक्यता असल्याने त्याठिकाणी भेटण्यास जातो असे सांगितले.त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर १५.५२ वाजता सुरू करून तो तक्रारदार यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो—याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार थोरात व पंच नं.१ गोदमले यांना तक्रारदार यांचे मोटर सायकलने मध्यवर्ती प्रशासकीय इमारत कराड येथे पाठविले. त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं. ०२ कारेकर असे आमचेकडील शासकीय न्यु बोलेरो वाहनाने तक्रारदार यांचे मोटरसायकलचे पाठोपाठ मध्यवर्ती प्रशासकीय इमारत कराड कार्यालयाचे आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. त्यावेळी तक्रारदार थोरात हे कोणाशी तरी फोनवर बोलत असल्याचे दिसले. त्यानंतर तक्रारदार थोरात व पंच नं.०१ गोदमले असे परत मोटरसायकल वरून मध्यवर्ती प्रशासकीय इमारती पासून निघाले आंम्ही त्यांचे पाठोपाठ शासकीय गोडावून परिसरामध्ये असलेल्या उपअधीक्षक भुमीअभिलेख कार्यालयाचे आवारात आलो.. त्यावेळी तक्रारदार थोरात व पंच नं.०१ गोदमले असे दोघेजण पायी चालत उपअधीक्षक भुमीअभिलेख कराड कार्यालयामध्ये गेले.तेथे परिरक्षण भुमापक मोडक यांना भेटले. त्यावेळी आंम्ही आजूबाजूला कोणाला संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावून थांबलो.त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार थोरात यांनी त्यांचे पॅन्टच्या डावे बाजूच्या खिशातील हातरूमाल काढून चेह—यावरून फिरवून परिरक्षण भुमापक मोडक यांनी पैसे स्विकारलेबाबतचा इशारा केला असता मी, पंच नं.०२ कारेकर व स्टाफ तेथे गेलो. त्यावेळी तक्रारदार थोरात यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर १६.१४ वाजता बंद करून तात्काळ लाच स्विकारलेल्या रक्कमेसह परिरक्षण भुमापक मोडक यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या. सदर घटनेचे माझे सुचनेवरून पोहेकॉ संदिप काशिद यांनी मोबाईलवर व्हिडीओ शुटिंग केले.त्यानंतर आंम्ही पंच नं.०१ गोदमले यांना तुम्ही व तक्रारदार असे परिरक्षण भुमापक मोडक यांना लाच रक्कम देण्यासाठी आला त्यावेळी काय घडले असे विचारले त्यावेळी त्यांनी सांगितले की,मी व तक्रारदार असे त्यांचे मोटरसायकलवरून मध्यवर्ती प्रशासकीय इमारत कराड येथे गेलो त्यावेळी तक्रारदार थोरात यांनी मोडक यांचे मोबाईलवर फोन करून कुठे आहेत असे विचारले त्यावेळी त्यांनी ते उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालयात असल्याचे सांगितलेने आंम्ही मोटरसायकल

वरून पुन्हा उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालयाकडे आलो.तेथे मोटरसायकल पार्क करून कार्यालयामध्ये आत पायी चालत गेलो त्यावेळी तक्रारदार व मोडक यांचेमध्ये कामाचे अनुषंगाने चर्चा झाली.त्यावेळी तक्रारदार यांनी देवू का तुम्हाला असे विचारले त्यावर मोडक यांनी हु मला पण निघायचं हाय चला ना  असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी **घ्या ना लागलीचं म्हणे असे म्हणाले व मोडक यांनी मागणी केलेले ७००० रूपये दिले ते घेवून मोडक यांनी त्यांचे पॅन्टच्या डाव्या बाजूच्या खिशात ठेवले त्यावेळी तक्रारदार थोरात यांनी हु मोजून घ्या असे म्हणाले त्यावेळी मोडक यांनी नाय राहु दे किती आहेत. आता निघायचं चारला डयुटी होती असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार यांनी पुर्वनियोजित इशारा केलेनंतर आपण,पंच नं.०२ कारेकर व सापळा पथक असे तेथे आला अशी हकीकत सांगितली.**त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही कराड शहर पोलीस ठाणे कराड जि.सातारा येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार थोरात यांचे व त्यांचे भाउ यांचे नांवे असलेल्या ओंड ता.कराड जि.सातारा येथील सिसनं ५८३ या मिळकतीमध्ये सुरू असलेल्या बांधकामाकरीता बॅक ऑफ महाराष्ट्र शाखा मलकापूर या बॅकेकडून घेतलेल्या २२,१२,००० रू. कर्जाचा मालमत्ता पत्रकावर बोजा नोंद करणेसाठी उपअधीक्षक भुमी अभिलेख कराड कार्यालयातील परिरक्षण भुमापक कुंडलिक मोडक यांनी पहिला हप्ता ७००० रूपये व काम झालेनंतर ३००० रूपये अशी १०,००० रूपये लाचेची मागणी करून त्यापैकी पहिला हप्ता लाच रक्कम ७००० रूपये तक्रारदार थोरात यांचेकडुन बेकायदेशिरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना त्यांना आम्ही तसेच सापळा पथकाने पकडले आहे म्हणुन माझी कुंडलिक खंडू मोडक वय ३८ वर्षे पद परिरक्षण भुमापक, उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय,कराड जि.सातारा रा.क्षीरसागर यांचे घरी भाडयाने ,होले फॅमिली स्कुल मागे,राजनंदिनी रेसिडेन्सी, सैदापुर कराड मुळगांव जिल्हा परिषद शाळेजवळ,खटकाळे ता.जुन्नर जि.पुणे यांचेविरूध्द माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष

(signature)
HC 1388

पोलीस स्टेशन ऑफिसर
कराड शहर पोलीस ठाणे, जि. सातारा
दि. ०3/02/2026

हा दिला जबाब स. ता. म.

(signature)
राजेंद्र अशोक सानप